# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक महेश बाळासो गायकवाड पोलीस उप निरीक्षक, पलूस पोलीस ठाणे वर्ग-२ यांनी तक्रारदार यांचेकडून ८,००,०००/- रु.लाचेची मागणी करुन २,००,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली यांचेकडून लाचेची रक्कम स्विकारलेने गुन्हा दाखल. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **सांगली** |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पलूस पोलीस ठाणे, जि.सांगली |
| गुन्हा नोंद क्रमांक व कलम | गु.र.नं. /२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| तक्रारदार | पुरुष वय २६ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय | महेश बाळासो गायकवाड पोलीस उप निरीक्षक, पलूस पोलीस ठाणे वर्ग-२ |
| पडताळणी दरम्यान मागणी केलेली लाचेची रक्कम | प्रथमतः ८,००,०००/- (आठ लाख) रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती २,००,०००/- रुपये लाच मागणी केली. |
| सापळा कारवाई दरमान स्विकारली लाच रक्कम | २,००,०००/- (दोन लाख) रुपये लाच स्विकारली |
| पडताळणी दिनांक व ठिकाण | ०२/०४/२०२५ पलूस पोलीस ठाणे येथे पोलीस अधिकारी कक्ष मध्ये |
| तपास अधिकारी | उमेश दा. पाटील पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.सांगली |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार पेशाने हॉटेल व्यवसायिक असुन फोरेक्स ट्रेडींगचा व्यवसाय देखील करतात. दि. ५/१०/२०२४ रोजी पलूस पोलीस ठाणे गुरनं १९०/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ११८ (२), ११५,१८९(२),१८९(४),१९१(१),१९१(३),१९०,६१(२)अन्वये दाखल गुन्हयात दि. १४/१०/२०२४ रोजी तपासाअंती यातील तक्रारदार यांना आरोपीत केले होते. त्यानंतर तक्रारदार यांना दि.४/०१/२०२५ रोजी किसान टायर्स पलूस येथून ताबेत घेवून पलूस पोलीस ठाणेत आणून अटकेची भिती दाखवून तक्रारदार यांचेकडे १०,००,०००/- रुपये मागणी करुन त्याच दिवशी तक्रारदार यांचकडून २,००,०००/- रुपये घेवून तक्रारदार यांना अटकपूर्व जामीन करुन घ्या असे सांगून सोडून देण्यात आले होते. दि.२०/०१/२०२५ रोजी तक्रारदार यांना सदर गुन्हयात उच्च न्यायालय येथे जामीन मंजुर झाला.तदनंतर यातील आलोसे यांनी तक्रारदार यांना समक्ष पोलीस ठाणेत बोलावून, फोनद्वारे बोलून उर्वरित ८,००,०००/- रुपये देणेकरीता तगादा लावला होता.दि.२५/०३/२०२५ रोजी तक्रारदार यांना यातील आलोसे यांनी पोलीस ठाणेत बोलावून घेवून उर्वरित ८,००,०००/-रुपयांची व्यवस्था कर अन्यथा तुझी चारचाकी गाडी नमूद गुन्हयात जप्त करीन तसेच फोरेक्स ट्रेडींग अनुषंगाने तुझी चौकशी चालू आहे.त्यामध्ये तुझेविरुध्द अजून एक गुन्हा दाखल करेन असे बोलून उर्वरित ८,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती.

दि.०२/०४/२०२५ रोजी यातील पलूस पोलीस ठाणे येथे आलोसे यांचे केबिन मध्ये पडताळणी केली असता आलोसे यांनी तडजोडी अंती २,००,०००/- रुपये लाचेची मागणी तक्रारदार यांचेकडे करुन सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडून २,००,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारताना रंगेहात पकडणेत आले आहे.

त्या अनुषंगाने आरोपी लोकसेवक महेश बाळासो गायकवाड पोलीस उप निरीक्षक, पलूस पोलीस ठाणे वर्ग-२ यांचे विरुध्द पलूस पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे सो ,अपर पोलीस अधीक्षक श्री.विजय चौधरी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.उमेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, सांगली, श्री.विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, श्री किशोर कुमार खाडे, पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार प्रीतम चौगुले, अजित पाटील, उमेश जाधव, सलीम मकानदार, चंद्रकांत जाधव, सुदर्शन पाटील, पोपट पाटील, रामहरी वाघमोडे, सीमा माने, धनंजय खाडे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप व मोबाईल नंबर ९५५२५३९८८९ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

**संपर्क :-**

1) **मोबाईल अॅप** - www.acbmaharashtra.net
2) **फेसबुक पेज** - www.facebook.com-maharashtraACB
3) **वेबसाईट** — www.acbmaharashtra.gov.in

**(उमेश दा. पाटील)**
**पोलीस उपअधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**सांगली.**

Scanned with OKEN Scanner